● शुक्रवार, दि. ११ ऑक्टोबर २०२४ ● जालना ● वर्ष ६ वे ● अंक ८० वा ● किमंत २ रुपये ● पाने

8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

जनसहृता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

## भाग्यनगर येथील विकासासाठी करोडो रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला - अर्जुनराव खोतकर

**जालना । प्रतिनिधी -** शहर महापालिका झाल्यामुळे शहराच्या विकासासाठी मोठ्या प्रमाणावर निधी उपलब्ध होऊ लागला असून भाग्यनगरच्या विकासासाठी आपण करोडो रुपयाचा निधी विविध विकास कामासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस व अजित पवार यांच्या माध्यमातून मंजूर करून घेतला आहे. भाग्यनगरचा डीपी रोड व अण्णाभाऊ साठे पुतळा ते मुक्तेश्वर द्वारपर्यंतचा हा मुख्य रस्ता सीसी ट्रिमिक्स पद्धतीने बांधकाम व्हावे, पुतळा ते मिसाळ टावर पर्यंतच्या भुमिगत नाला व सिमेंट रोड हवा अशी या भागाचे नगरसेवक लक्ष्मीकांत पांगारकर, गोपीकिशन गोगडे व रहिवासी नागरिकांची सततची मागणी होती. त्यांचा माझ्याकडे सततचा या कामासाठी पाठपुरा होता. त्यांच्या मागणीची दखल घेऊन मी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे पाठपुरावा केला व ही मागणी मंजूर करून घेतली. यासाठी अकरा कोटी रुपयांचा निधी उपलब्ध झाला असून हा रस्ता दर्जेदार होणार आहे. तसेच भाग्यनगरचा डीपी रोड साठी जिल्हा नियोजन समितीमधून चार कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून घेतला. वैशिष्ट्यपूर्ण योजनेतून मधून अण्णाभाऊ साठे पुतळा ते मिसाळ टावर पर्यंतचा मोठा नाला व सिमेंट रस्ता बांधकामासाठी दोन कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून घेतला. आता या रस्त्याचे कामे झाल्यामुळे भाग्यनगरचा विकासामध्ये व सौंदर्यकारणामध्ये भर पडली असून या भागातून जाणारी जड वाहतुकी बंद करून इतरत्र वळविण्याचा प्रयत्न करणार असल्याचेही यावेळी माजी राज्यमंत्री श्री खोतकर यांनी सांगितले.



गुरुवार (दि १०) अण्णाभाऊ साठे स्मारक ते मुक्तेश्वर प्रवेशद्वारे रस्त्याचे भूमिपूजन करण्यात आला होता. कार्यक्रमाच्या शुभारंभ प्रसंगी प्रथम अण्णाभाऊ साठे पुतळ्याला पुष्पहार अर्पण करण्यात आला. उद्योगरत्न पद्मभूषण रतन टाटा यांच्या प्रतिमेला पुष्पहार घालून भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

यावेळी माजी केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे, शिवसेना जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे, भाजपचे जिल्हा अध्यक्ष बद्रीनारायण पठाडे, भास्कर दानवे, राजेश राऊत, शिवसेना जिल्हा संपर्कप्रमुख पंडित भुतेकर, शहर प्रमुख विष्णू पाचफुले, आत्मानंद भक्त, गोपीकिशन गोगडे, लक्ष्मीकांत पांगारकर, श्रीकांत शेलगावकर, डॉ. प्रभू, रवींद्र देशपांडे, प्रा. रावसाहेब ढवळे, शिवाजीराव गोंटे, भरतराव गव्हाणे, सौ कालींदाताई ढगे, शुभांगी देशपांडे, संतोषराव मोहिते, गणेश सुपारकर, पांडुरंग डोंगरे, ॲड. अशपाक पठाण, योगेश रत्नपारखे, कुणाल जाधव, अंकुशराव पाचपफुले, जाफर खान, किशोर पांगरकर, ताहेर खान, रत्नमाला जाधव, फोपलीयाताई, मेघराज चौधरी, सखाराम लंके, भोला कांबळे, पिटर खंदारे, संताजी वाघमारे, राम सतकर, रामकिसन कांयदे, किरण शिरसाट, शुभम टेकाळे, अर्जुन गेही, किशोर शिंदे, संदीप साबळे, शरद ढाकणे ,संतोष शेलार कांतराव रांजणकर, राजू बाबरेकर, विश्वास भोरे, संदीप हिवराळे, सुशील भावसार, फलंब्रीकर महाराज, सुमित पाटील, सोनू साळवे, संताजी वाघमारे, पंजाबराव जराड, सिद्धिविनायक मुळे, राज रत्नपारखे, दीपक राठोड, संतोष परळकर, श्री दाबके आदी मान्यवर उपस्थित होते.

## भाजपा जालनाच्या वतीने रतन टाटा यांना श्रद्धांजली



**जालना । प्रतिनिधी -** रतन टाटा यांनी वयाचे ८६ व्या वर्षी जगाचा निरोप घेतला, रतन टाटा यांच्या निधनानंतर अवघ्या देशभरातून शोक व्यक्त केला जात आहे. भारतीय जनता पार्टी जिल्हा जालना च्या वतीने आज (दि.१०) रोजी भाजपा जिल्हा कार्यालय जालना येथे त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. यावेळी माजी केंद्रीय राज्यमंत्री रावसाहेब दानवे यांची प्रमुख उपस्थिती होती.

माजी केंद्रीय राज्यमंत्री रावसाहेब दानवे म्हणाले की, रतन टाटा हे नाव भारताच्या औद्योगिक आणि सामाजिक क्षेत्रातील महत्त्वाच्या व्यक्तिमत्वांपैकी एक आहे. त्यांचा संपूर्ण जीवनप्रवास कर्तृत्व, नेतृत्व, आणि समाजसेवा याचा संगम होता. त्यांनी टाटा समूहाचे नेतृत्व करत असताना, भारताच्या उद्योग क्षेत्रात अमूल्य योगदान दिले आणि अनेकांना प्रेरणा दिली. रतन जी टाटा यांनी आपल्या संपूर्ण जीवनातून उद्योगक्षेत्र आणि समाजसेवा यांचा समतोल साधत एक आदर्श उभा केला आहे. त्यांच्या दूरदृष्टीमुळे टाटा समूहाने केवळ भारतातच नव्हे तर जागतिक स्तरावरही मानाचे स्थान मिळवले. त्यांचे नेतृत्व, समाजसेवा आणि साधेपणा यामुळे ते कायमच आपल्यासाठी आदर्श ठरतील. यावेळी भाजपा जालना विधानसभा प्रमुख भास्कर दानवे, जिल्हाध्यक्ष बद्रीनाथ पठाडे, प्रदेश सदस्य राजेश राऊत, विजय कामड, सिद्धिविनायक मुळे, धनराज काबलिये, औदुंबर बागडे, अर्जुन गेही, संध्याताई देठे, अरुणाताई जाधव, कविता नागवे, वसंतराव शिंदे, अमोल कारंजेकर, सिद्धेश्वर हाजबे, महादूआप्पा झारकंडे, आनंद झारकंडे, प्रमोद गंडाळ, संजय डोंगरे, रामलाल जाधव, दिगांबर सातपुते, मुकेश चव्हाण, गोपाल चौधरी, सोमेश काबलीये, डोंगरसिंग साबळे, सुनील खरे, सुनील पवार, रोहित नलावडे, अमन मित्तल, कृष्णा गायके, योगेश शिमगे, विकास कदम, शाम जाधव, दत्ता जाधव, उद्धव ढवळे, अतुल चव्हाण, प्रताप चौधरी, बाळू कावळे, मुरली सहारे, विष्णू राठोड, सुधाकर शिंदे, मांगीलाल पवार, हरिभाऊ पवार आदींसह भाजपा पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## अंमली पदार्थांची तस्करी; २ हजार कोटींचा माल

**दिल्ली -** पोलिसांच्या स्पेशल सेलने गुरुवारी अंमली पदार्थांच्या तस्करीचा पर्दाफाश केला आहे. रमेश नगर भागात असलेल्या एका गोदामातून सुमारे २०० किलोग्राम कोकेन जप्त करण्यात आले असून पान २ वर

## जालन्यातील महीला आयटीआय तात्काळ सुरू करा

### आ. गोरंटयाल यांची राज्यपालांकडे मागणी



**जालना । प्रतिनिधी -** मागील पंधरा वर्षापूर्वी जालना येथे मुलींसाठी मंजूर करण्यात आलेली औद्योगिक प्रशिक्षण संस्था अपेक्षित असलेल्या पदे आणि यंत्रसामुग्रीसह तात्काळ सुरू करावी अशी आग्रही मागणी आ. कैलास गोरंटयाल यांनी राज्याचे राज्यपाल सी.पी.राधाकृष्णन यांची भेट घेऊन केली. दरम्यान, या बाबत सकारात्मक प्रतिसाद देत सदर संस्था कार्यान्वित करण्याबाबत मुख्यमंत्र्यांशी चर्चा करून निर्णय घेण्यात येईल अशी ग्वाही राज्यपालांनी यावेळी दिली.

जालना येथील नव्याने सुरू करण्यात आलेल्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या कामाचा शुभारंभ देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आज दूरदृश्य प्रणालीद्वारे करण्यात आले. जालना येथील जिल्हा प्रशासकीय इमारतीमधील महसूल भवन मध्ये आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमास महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांची प्रमुख उपस्थिती होती. या कार्यक्रमानंतर जालन्याचे आ.कैलास गोरंटयाल यांनी राज्यपालांची भेट घेऊन त्यांना लेखी निवेदन दिले. त्यात म्हटले आहे की, महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाने दि. २६ जुन २००९ रोजी काढलेल्या एका शासन निर्णयाद्वारे राज्यातील महिलांसाठी २० नविन औद्योगीक प्रशिक्षण संस्था स्थापन करण्यास तत्वतः पान २ वर

## महामहीम राज्यपालांनी केला तेजल साळवेचा सत्कार

### चीन येथील एशियन युथ चॅम्पियनशिप मध्ये केली होती रजत कामगिरी

**जालना । प्रतिनिधी -** महामहीम राज्यपाल सीपी राधाकृष्णन यांनी येथील रजत पदक विजेता प्रतिभावान युवा धनुर्विद्या खेळाडू तेजल राजेंद्र साळवे हीचा सत्कार करून कौतुकाची थाप दिली.



चायना येथील तायपेई येथे २५ सप्टेंबर ते ४ ऑक्टोबर दरम्यान पार पडलेल्या एशियन आर्चरी युथ चॅम्पियनशिपचे मध्ये तेजल ने ५० मीटर सांघिक प्रकारात चमकदार कामगिरी करत सिल्व्हर मेडल पटकाविला होता. यावेळी तेजल सोबत तिचे शिवछत्रपती पुरस्कार विजेते आंतरराष्ट्रीय प्रशिक्षक चंद्रकांत इलग यांचा देखील सत्कार करण्यात आला. राज्य शासन सदैव तेजलच्या पाठीशी खंबीर असून तेजल लवकरच ओलंपिक मध्ये भारताला सुवर्ण पदक मिळवून देईल, असा आशावाद राज्यपाल राधाकृष्णन यांनी यावेळी व्यक्त केला. महामहीम राज्यपाल सिपी राधाकृष्णन आज जालना दौऱ्यावर असताना शासकीय विश्रामगृहात आयोजित एका छोटेखानी सत्कार समारंभात ते बोलत होते. यावेळी, जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ, जिल्हा पोलिस अधीक्षक अजयकुमार बन्सल, जिल्हा क्रीडा अधिकारी संजय गाढवे आदींची उस्थिती होती.

**तेजलची कामगिरी**

तेजल ने यापूर्वी जून मध्ये झालेल्या एशिया कप स्टेज थ्री मध्ये सांघिक गटामध्ये सिल्वर मेडल मिळवलेले आहे ही स्पर्धा सुवान कोरिया येथे पार पडली होती. तेजल ही आर्चरी कंपाउंड अंडर १८ ची खेळाडू असून आतापर्यंत तेजल ने नॅशनल गेम्स मध्ये ब्राँझ मेडल, खेलो इंडिया युथ गेम्स मधये वैयक्तिक गटात सिल्वर मेडल, सीनियर नॅशनल गेम्स मध्ये गोल्ड मेडल आणि ब्राँझ मेडल अशाप्रकारे राष्ट्रीय स्तरावर देखील चमकदार कामगिरी केलेली आहे.

युवा आदर्श

### महागौरी मा...

**महागौरी शुभ्र वर्णी**
**श्वेत वृषे समारूढा**
**अक्ष दिपले पाहता**
**चतुर्भुजा सिंहरुढा**
**अष्ट वर्षी कुमारिका**
**कठीण तप पहाडा**
**वज्र ही मऊ होईलं**
**मेघ बरसला धडाडा**
**कळली कुठे लिला**
**शक्ती तव महामुढा**
**संसारी रहाट गाडा**
**चक्राफसे महागुढा**
**शुभनिशुंभ दैत्याशी**
**देई आई सार्थ लढा**
**मनातल्या षड्रिपुंचा**
**भरलासे पाप घडा**
**दंभपणा काढेफणा**
**वाजे अहम् चौघडा**
**असुरी वृत्ती कडेचं**
**सदैव आमचा ओढा**
**त्राहीत्राही माते मम**
**सोसेना राम रगाडा**
**सोडवी सहज जरा**
**आयुष्याचा तिघाडा**

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

## बांधकाम कामगारांच्या समस्यांसाठी सदैव कटिबद्ध -माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर

**परतूर । प्रतिनिधी -** महाराष्ट्रातील प्रत्येक घटकाचा सर्वांगीण विकास व्हावा यासाठी महायुतीचे सरकार प्रयत्नशील असून बांधकाम कामगार बांधवांना सर्व सेवा सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी आपण सातत्याने प्रयत्नशील आहोत त्यानिमित्ताने बांधकाम कामगारांना पेट्या वाटप संस्था उपयोगी साहित्य अर्थात भांड्याचे वाटप यासह त्यांच्या मुलांना शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून देणे त्यांच्या आरोग्याच्या सुविधा उपलब्ध करून देणे अशा एक ना अनेक प्रकारच्या सुविधा उपलब्ध करून देत महाराष्ट्रातील महायुतीचे सरकार कायम बांधकाम कामगारांच्या पाठीशी ठामपणे उभे पासून त्यांच्या सर्वांगण विकासासाठी मी व महायुती सरकार कटिबद्ध असल्याचे प्रतिपादन माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांनी केले

परतूर येथील भारतरत्न अटल बिहारी वाजपेयी नाट्यगृह या ठिकाणी आयोजित बांधकाम कामगारांना किचन सेट मिळण्यासाठी आवश्यक असणाऱ्या थंब सुविधा कॅम्प दरम्यान श्री लोणीकर बोलत होते यावेळी मागील अनेक दिवसांपासून केवळ थंब सुविधा न मिळाल्यामुळे अनेक बांधकाम कामगार किचन सेट पासून वंचित राहिले होते या बाबीची दखल घेत माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांनी पुढाकार घेऊन ही सुविधा थेट परतूर शहरात उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न केले यावेळी ७५९ लाभार्थ्यांनी थंब दिला. यासाठी कामगार कल्याण मंत्री श्री सुरेश खाडे यांच्याशी बोलून मतदारसंघातील बांधकाम कामगारांना सुविधा उपलब्ध करून देण्यासंदर्भात विनंती केली असल्याचे देखील लोणीकरांनी यावेळी सांगितले


पुढे बोलताना श्री लोणीकर म्हणाले की बांधकाम कामगारांनी अत्यंत हलकीच्या परिस्थितीत त्यांचे जीवन व्यतीत केलं असून यापुढे त्यांच्या मुलाबाळांना चांगले दिवस यावे यासाठी सातत्याने प्रयत्न करणे पान २ वर



## संपादकीय

# महानायक

हिंदी चित्रपटसृष्टीचा शहेनशहा, महानायक अमिताभ बच्चन यांचा वाढदिवस. ११ ऑक्टोबर १९४२ रोजी उत्तरप्रदेशातील अलाहाबाद येथे जन्मलेल्या अमिताभ यांच्या वडिलांचे ( हरिवंशराय बच्चन ) मूळ आडनाव श्रीवास्तव असले तरी ते बच्चन या टोपणनावाने कविता प्रसिद्ध करीत त्यामुळे अमिताभ यांनीही चित्रपट सृष्टीत आल्यावर बच्चन हेच टोपणनाव आडनाव म्हणून वापरण्यास सुरवात केली. पुढे संपूर्ण कुटुंबाचेच बच्चन हेच आडनाव व्यवहारात रूढ झाले. अमिताभ बच्चन यांचे शालेय शिक्षण अलाहाबाद येथील ज्ञानप्रबोधिनी आणि बॉईज हायस्कूल येथे झाले. दिल्लीच्या किरोडीमल महाविद्यालयातून त्यांनी विज्ञानाची पदवी घेतली त्यानंतर काहीकाळ त्यांनी कोलकाता येथे एका कंपनीत काम केले पण तिथे त्यांचे मन रमले नाही तेथून ते मुंबईत आले आणि चित्रपटात कामाच्या संधी शोधू लागले. अमिताभ बच्चन यांना ख्वाजा अहमद अब्बास यांच्या सात हिंदुस्थानी या चित्रपटात संधी मिळाली. दुर्दैवाने हा चित्रपट चालला नाही. अमिताभ यांचाही म्हणावा तसा प्रभाव पडला नाही. अमिताभ बच्चन यांनी हिंदी चित्रपट सृष्टीत पदार्पण केले तेंव्हा देव आनंद, शम्मी कपूर, राजेश खन्ना, विनोद खन्ना, जितेंद्र, धर्मेंद्र, शशी कपूर अशा देखण्या नायकाची चलती होती. अशा काळात अमिताभ तग धरतील का ? अशी साशंकता होती त्यात त्यांच्या पहिलाच चित्रपट जोरदार आपटला मात्र त्यांनी हार मानली नाही. सलग सात चित्रपट आपटूनही ते डगमगले नाही. १९७३ साली आलेल्या प्रकाश मेहरा दिग्दर्शित जंजीर या चित्रपटाने अमिताभ यांना खरा ब्रेक मिळवून दिला. या चित्रपटातील पोलीस इन्स्पेक्टरची त्यांची भूमिका खूप गाजली. या चित्रपटानंतर त्यांची अँग्री यंग मॅन अशी जनमानसात प्रतिमा निर्माण झाली. प्रचलित समाजव्यवस्थेच्या विरोधात बंडखोरी व क्रोध व्यक्त करणाऱ्या युवकांचे प्रतिनिधित्व त्यांनी पडद्यावर साकारले त्यामुळेच त्यांच्या भूमिका प्रेक्षकांना आपल्याशा वाटल्या. उंच शरीरयष्टी, भेदक डोळे, भारदस्त आवाज आणि अनोखी अभिनय शैली यामुळे त्यांनी प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य गाजवले. ते लवकरच सुपरस्टार पदावर पोहचले. दिग्दर्शक ऋषिकेश मुखर्जी यांच्या आनंद चित्रपटात त्यांना सुपरस्टार राजेश खन्ना यांच्यासमवेत काम करण्याची संधी मिळाली. या संधीचे त्यांनी सोने केले. त्यावर्षीचा सर्वोत्कृष्ट सहाय्यक अभिनेत्याचा फिल्मफेअर पुरस्कार त्यांना मिळाला. नमक हराम या चित्रपटातील त्यांची भूमिकाही लक्षवेधी ठरली. ७० आणि ८० चे दशक अमिताभ बच्चन यांनी अक्षरशः गाजवून सोडले. दिवार, शोले, अभिमान, कभी कभी, अमर अकबर अँथनी , मुक्कदर का सिकंदर, त्रिशूल, डॉन, काला पथर, नशीब, लावरीस, सिलसिला, नमक हलाल, कुली, शराबी, खुद्दार, अग्निपथ असे एकापेक्षा एक सुपरहिट चित्रपट त्यांनी दिले. अमिताभ बच्चन यांच्या इतकी लोकप्रियता आजतागायत कोणत्याही अभिनेत्याला लाभलेली नाही. अमिताभ बच्चन हे त्यांच्या काळातील सर्वाधिक मानधन घेणारे अभिनेते होते. त्यांनी आजवर २०० हुन अधिक चित्रपटात भूमिका केल्या. त्यांनी काही चित्रपटात पार्श्वगायनही केले. मिस्टर नटवरलाल चित्रपटातील पार्श्वगायनासाठी त्यांना फिल्मफेअरचा पुरस्कारही मिळाला होता. १९८४ साली त्यांनी राजकारणात प्रवेश केला मात्र हा आपला प्रांत नाही हे लक्षात येताच त्यांनी राजकारणाला रामराम केला. १९८२ साली कुली चित्रपटाच्या शूटिंगच्या वेळी अपघात होऊनही करोडो चाहत्यांच्या आशीर्वादाने अमिताभ पुन्हा एकदा उभे राहिले. १९९६ साली अमिताभ बच्चन कॉर्पोरेशन लिमिटेड ही कंपनी त्यांनी स्थापन केली. मात्र लवकरच त्यांना ती बंद करावी लागली या दरम्यान त्यांना मोठे आर्थिक नुकसान सहन करावे लागले. हे आर्थिक नुकसान भरून काढण्यासाठी त्यांनी दूरचित्रवाणीवरील कौन बनेगा करोडपती या मालिकेचे सूत्रसंचालन करण्यास सुरुवात केली. कौन बनेगा करोडपती ही प्रश्नमंजुषा देखील त्यानी यशस्वी केली. आज ते वयाची ८२ वर्ष पूर्ण करत असले तरी तरुणांना लाजवेल असा त्यांचा उत्साह आहे. अमिताभ बच्चन यांच्यासारखा प्रतिभावान कलाकार युगातून एकदाच जन्माला येतो. त्यांच्यासारखा अभिनेता भारतातच नव्हे तर जगात झाला नाही आणि पुढे देखील होणार नाही. अमिताभ बच्चन यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देतानाच त्यांना दीर्घायुष्य लाभो अशी ईश्वर चरणी प्रार्थना करतो. अमिताभ बच्चन यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा!



**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

## राज्यपाल राधाकृष्णन यांनी साधला विविध क्षेत्रातील मान्यवरांशी संवाद

**जालना । प्रतिनिधी -** महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन हे आज जालना जिल्हा दौऱ्यावर आले असता, त्यांनी शासकीय विश्रामगृह येथे विविध लोकप्रतिनिधी, वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी, राजकीय पक्षांचे प्रमुख, जालना जिल्ह्याच्या विकासाच्या विषयाच्या अनुषंगाने चर्चा केली. यावेळी त्यांनी जिल्ह्यातील उद्योग, आरोग्य, क्रिडा, साहित्य, क्रिडा, लोकप्रतिनीधी, राजकीय, माध्यम क्षेत्रातील मान्यवर व्यक्ती तसेच इतर विविध घटकातील व्यक्तींशी संवाद साधून त्यांच्या जालना जिल्ह्याच्या विकासाशी संबंधीत समस्या आणि अपेक्षांची माहिती जाणुन घेतली.


# खेळाने जगायला आणि लढायला शिकवले

## खो-खो खेळातील नवदुर्गा; प्रियांका येळे

**'मी तिचा अभ्यास घेईन पण तिला खो-खो खेळूद्या' असे म्हणून भाऊ पाठीशी खंबीरपणे उभा राहिला आणि प्रियांकाने खो-खो विश्वात यशाचा झेंडा रोवला. फलटण तालुक्यातील साखरवाडीतून खो-खो खेळायला सुरुवात करणारी प्रियांका रामचंद्र येळे आहे नवरात्र उत्सवातील सातवी नवदुर्गा. सध्या ती जिल्हा परिषद क्रीडा प्रबोधिनी जालना येथे खो-खो मार्गदर्शक असून क्रीडा व युवक सेवा संचालन महाराष्ट्र शासनाच्या खेळाडूंच्या थेट भरतीमध्ये नुकतीच तिची निवड झाली आहे.**



प्रियांकाचे वडील साखर कारखान्यात काम करायचे तर आई गृहिणी होत्या. प्राथमिक शिक्षण घेत असतानाच प्रियांकाने तिच्यातील खेळाडूची चुणूक दाखवली. धावण्याच्या स्पर्धेत प्रत्येक वेळी ती पहिली यायची. हे पाहून भाऊ राहुल याला खूप आनंद व्हायचा व आपल्या बहिणीने खो-खो खेळात उतरले पाहिजे असे त्याला वाटले. कारण साखरवाडी हे गाव खो-खो रत्नांची खाणच. इथल्या मैदानाने अनेक राष्ट्रीय खेळाडू घडविले. पण एका बाजूला आई वडिलांना वाटायचे की मुलगी अभ्यासात खुप हुशार आहे खेळामुळे अभ्यासाकडे दुर्लक्ष होईल. पण भाऊ राहुल दादा म्हणाला मी तिचा अभ्यास घेईन पण तिला खेळू द्या. उपजतच अंगी वेग असणारी प्रियांका खो-खो खेळातील तरबेज खेळाडू बनली. तालुका, जिल्हा, पुढे विभाग व राज्य स्पर्धेत जसजशी ती चमकायला लागली तसे मग घरून पण खेळासाठी वातावरण सकारात्मक झाले. एका स्पर्धेला पोहचण्यासाठी उशीर झाल्यामुळे शाळेचा संघ स्पर्धेला निघून गेला होता हे पाहून प्रियांका खूप रडली, त्यानंतर सरांनी तिला त्या बदल्यात दोन मोठया स्पर्धा बघायला घेऊन गेले आणि तिथूनच प्रेरणा घेऊन खो-खो प्रवासाची सुरुवात झाली .



साखरवाडी विद्यालयाच्या मैदानावर ती रोज सरावाला जायची. तिथं सर्व मुली टी शर्ट शॉर्ट वर सराव करायच्या. लग्न, घरगुती कार्यक्रम, गणेशोत्सव, दुर्गोत्सव, सांस्कृतिक कार्यक्रम कशात सहभागी नाही. खो-खो हाच ध्यास अन खो-खो हाच श्वास असा आमचा संघ होता. फक्त खेळ महत्वाचा आहे का ? जगावेगळं काहीतरी करत राहता असं लोकं बोलायची. प्रियांका सोबतच्या वर्गातील इतर मुली अभ्यास करायच्या आणि ती खेळायला जायची. हे पाहून आई वडीलांना शेजारचे लोक आणि पाहुणे म्हणायचे कशाला पाठवता खेळाला ? काय करणार ती खेळून? पण प्रियांकाच्या आईचे विचार प्रगल्भ होते. त्या म्हणाल्या 'माझ्या मुलींना मी खूप स्वच्छंद जगायला शिकवणार, त्या आकाशात पाखरा सारखी भरारी घेण्यासाठी आहेत ना की जबरदस्ती त्यांना घरात ठेवण्यासाठी'. मामा आणि आई वडील कायम खंबीरपणे सोबत असायचे. माझ्या सोबत छोटी बहीण पुजा पण सराव करायला यायची. विशेष म्हणजे ती पण राष्ट्रीय खो-खो खेळाडू आहे.

प्रियांकाचे खो-खो खेळातील सरंक्षण अत्यंत उत्तम होते. प्रतिस्पर्धी संघाने तिला बाद करणे हीच सामन्यातील आव्हानात्मक गोष्ट असायची. सातवीत असताना पुणे महापौर चषक स्पर्धेत तिने वेस्ट बंगाल विरुद्ध तब्बल नऊ मिनिटे पळतीचा खेळ केला आणि तिला तत्कालीन खो-खो संघटनेचे अध्यक्ष अजितदादा पवार यांच्याकडून शाबासकीची थाप मिळाली व स्वतः बोलावून घेऊन खेळाचे कौतुक केलं. इयत्ता आठवीत असताना वरिष्ठ महिला राष्ट्रीय स्पर्धेत तिला सुवर्णपदक मिळाले. 'वय १३ वर्षे होते आणि सुवर्णपदकाची कामगिरी केली होती वरिष्ठ महिला गटामध्ये'; हे किती कौतुकास्पद आहे !

खेळला एवढा वेळ देऊन देखील ती मुधोजी कॉलेज फलटण येथून विज्ञान शाखेतून पदवीधर आहे. दादोजी कोंडदेव पुरस्कार विजेते प्रशिक्षक संजय जिजाबा बोडरे यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली प्रियांकाने आजपर्यंत ईला पुरस्कार, वीर जानकी पुरस्कार, राणी लक्ष्मीबाई पुरस्कार, महाराष्ट्र शासनाचा शिवछत्रपती क्रीडा पुरस्कार असे जवळपास सर्वच मनाचे पुरस्कार तिला मिळाले आहेत. एवढे बहुमान मिळवणारी प्रियांका महाराष्ट्रातील प्रथम महिला खेळाडू आहे. २३ राष्ट्रीय स्पर्धेत सहभाग घेऊन १८ सुवर्णपदक, ४ रौप्यपदक, १ कांस्यपदक मिळाले. पाच वेळा महाराष्ट्र संघाचे तिने कर्णधारपद भूषविले आहे.

सध्या खो-खो खेळणाऱ्या मुलींना संदेश देताना प्रियांका सांगते खेळात पण करिअर करता येऊ शकते. येत्या काळात खो-खो चा वर्ल्ड कप देखील जाहीर झाला आहे. त्यामुळे खो-खो ला अजून चांगले दिवस येणार आहेत. खेळामुळे आपण एक चांगले जीवन जगू शकतो, आयुष्यातील येणारा प्रत्येक चढउतार सहज पेलवू शकतो हे फक्त खेळामुळे होऊ शकते. खेळ जगायला आणि लढायला शिकवतो ! सध्या सुद्धा प्रियांका खो-खो साठी योगदान देत असून प्रशिक्षक म्हणून कार्यरत आहे. तिचे पती आशिष केसकर यांनी तिला खेळापासून कधीच दूर केलेले नाही.

सर्वसामान्य कुटुंबातून येऊन सुद्धा खो-खो खेळाच्या मदतीने प्रियांकाने यशाची शिखरे पादाक्रांत केली. तिच्या मेहनत व जिद्दीचे तिला फळ मिळाले. पुढील काळात देखील तिच्या मार्गदर्शनाखाली तिच्यासारखेच अनेक राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय खेळाडू तयार व्हावेत याच नवरात्र उत्सवाच्या निमित्ताने तिला शुभेच्छा ! आम्हाला तुझा अभिमान आहे.

**संकलन : डॉ. राजकुमार देशमुख**

## शंभर दोनशे ऐवजी डायरेक्ट पाचशे रुपयांच्या स्टॅम्प पेपर मुद्रांक शुल्क वृद्धीमुळे जनतेचे कंबरडे मोडणार!

भारतीय मुद्रांक शुल्क कायदा १८९९ आणि महाराष्ट्र मुद्रांक शुल्क कायदा १९५८ अन्वये सरकारी आणि खाजगी कामकाजात महत्वपूर्ण भूमिका बजावणारे शंभर आणि दोनशे रुपयांचे स्टॅम्प पेपर्स आता शासनाच्या नवीन निर्णया नुसार कालबाह्य झाले आहेत आणि त्यांची जागा डायरेक्ट पाचशे रुपयांच्या स्टॅम्प पेपरने घेतली आहे. शासनाच्या या निर्णयामुळे राज्यातील सर्वसामान्य गोरगरीब जनतेला मोठ्या प्रमाणात आर्थिक भुर्दंड सोसावा लागत आहे.

स्टॅम्प पेपर अर्थात मुद्रण पत्र तथा, मुद्रांक पेपर यांचे महत्त्व खाजगी आणि सरकारी कामकाजात अनन्यसाधारण असे आहे. असे म्हटल्यास ते वावगे ठरणार नाही. कारण राज्यातील सर्व सामान्य जनतेच्या दैनंदिन जीवनात स्टॅम्प पेपर्स ची भूमिका अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. नागरी जीवनात स्टॅम्प पेपर्स चा वापर नोटरी, प्रतिज्ञापत्र,मुद्रांक शुल्क, सरकारी फी, टॅक्स कर, मालमत्ता व्यवहार, भाडे करार, खरेदी खत, साठे खत, दिवानी, फौजदारी प्रकरणें, विक्री करार, स्थावर मालमत्तेचे हस्तांतरण, करारनामे, शपथ पत्र, इच्छा पत्र, हक्क सोड पत्र, बँकिंग व्यवहार, सरकारी दस्तऐवज, प्रमाणपत्रे इत्यादी बाबींसाठी मोठ्या प्रमाणात केला जातो.

शासनाच्या सदर नवीन निर्णया आधी जी कामे शंभर, दोनशे रुपयांच्या स्टॅम्प पेपर्स मुद्रांक शुल्कात होत होती त्या कामांसाठी आता किमान पाचशे रुपयाचा स्टॅम्प पेपर आवश्यक आहे. यामुळे सरकारी तिजोरीत मोठ्या प्रमाणात आर्थिक भर पडणार आहे यात शंका नाही मात्र दुसरीकडे राज्यातील गोरगरीब सर्वसामान्य जनतेचा खिच्याला आर्थिक भुर्दंडाची कात्री लागणार आहे. शासनाच्या मुद्रांक शुल्क वाढीमुळे राज्यातील सर्व सामान्य जनतेत सर्वत्र असंतोषाचे वातावरण निर्माण झाले असून शासनाच्या सदर मुद्रांक शुल्क वाढीच्या निर्णया विरुद्ध नाराजी दिसून येत आहे. त्यामुळे शासनाने राज्यातील सर्व सामान्य गोरगरीब जनतेच्या भावना लक्षात घेऊन सदर निर्णया बाबत शासनाने अत्यंत सहानुभूती पूर्वक फेरविचार करून आपल्या राज्यातील सर्व सामान्य गोरगरीब जनतेला आर्थिक दृष्ट्या कशा प्रकारे दिलासा देता येईल याचा सर्वंकष विचार विनिमय करणे गरजेचे आहे. कारण आपण जर राज्यातील सद्यस्थितीचा विचार केला तर राज्यातील सर्व सामान्य गोरगरीब जनता महागाईच्या क्रुर वरवंट्या खाली दिवसेंदिवस भरडली जात आहे. सद्या जीवनावश्यक वस्तूंचे दर तासागणिक, दिवसेंदिवस गगनाला जाऊन भीडत चालले आहेत. त्यामुळे ते सर्व सामान्य ग्राहकांच्या आर्थिक आवाक्याबाहेर चालले आहेत. त्याचप्रमाणे जीवनावश्यक औषधे, कृषी क्षेत्राशी संबंधित बी बियाणे, खते, औजारे, भरमसाठ वीज बिल आकारणी, परिवहन भाडे, फळं, भाजीपाला, अन्न धान्य यांच्या किंमती देखील भरमसाठ वाढवण्यात आल्या आहेत. अशा परिस्थितीत सर्व सामान्य गोरगरीब जनतेचे जगणे दिवसेंदिवस कठीण होत चालले आहे.



राज्यातील सर्व सामान्य गोरगरीब जनतेची गरीबी आणि बेकारीमुळे दयनीय आणि चिंताजनक अशी भयाण परिस्थिती असताना दुसरीकडे महागाई आणि विविध प्रकारचे कर, मुद्रांक शुल्क वृध्दी करून महागाई ने आणि बेरोजगारी ने त्रस्त झालेल्या सर्व सामान्य गोरगरीब जनतेच्या खिच्याला आर्थिक कात्री लावून कंबरडे मोडत आहे.

**विश्वास बळीराम गायकवाड**
**बोरघर / माणगाव, रायगड**
**९८२२५८०२३२, ८००७२५००१२**

पान १ वरुन

### अमली पदार्थांची ...

याची किंमत २००० कोटी रुपये आहे. इंडिया टुडेने यासंदर्भातील वृत्त दिलं आहे.

कोकेनची वाहतूक करण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या कारमध्ये जीपीएस असल्याने ड्रग्ज सिंडिकेटचा पर्दाफाश झाला. पोलिसांनी त्यांचे ऑपरेशन करण्यासाठी जीपीएस लोकेशन ट्रॅक केले आणि ड्रग्ज जप्त केले, असे पोलिसांनी सांगितले. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, जप्त केलेली औषधे स्नॅक पॅकेटमध्ये लपवून ठेवण्यात आली होती. दिल्लीत कोकेन आणल्याचा आरोप असलेला माणूस लंडनला पळून गेला आहे, असे सूत्रांनी इंडिया टुडे टीव्हीला सांगितले. यापूर्वी ५६० किलो कोकेन आणि ४० किलो हायड्रोपोनिक गांजा जप्त करण्यात आला होता. याची किंमत अंदाजे ५ हजार ६२० कोटी रुपये आहे. दक्षिण दिल्लीतील महिपालपूर येथील एका गोदामातून २ ऑक्टोबर रोजी ही धाड टाकण्यात आली होती.

तुषार गोयल (४०), हिमांशू कुमार (२७) आणि औरंगजेब सिद्दीकी (२३) आणि भरत कुमार जैन (४८) या चौघांना घटनास्थळी अटक करण्यात आली, तर इतर दोघांना अमृतसर आणि चेन्नई येथून ताब्यात घेण्यात आले. अखलाक या आणखी एका व्यक्तीला उत्तर प्रदेशातील हापूर येथून आदल्या दिवशी अटक करण्यात आली होती. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, अखलाक उत्तर भारतात अमली पदार्थांची वाहतूक करण्यास मदत करायचा.

दिल्ली पोलिसांनी ५ हजार ६२० कोटी रुपयांच्या ड्रग कार्टेलमध्ये सहभागी असल्याचा संशय असलेल्या भारतीय वंशाच्या दुबईस्थित व्यावसायिक वीरेंद्र बसोया विरुद्ध लुकआउट परिपत्रक (ङजउ) जारी केले आहे.

### जालन्यातील महिला ..

मान्यता दिलेली आहे. त्यामध्ये जालना येथील औद्योगीक प्रशिक्षण संस्थेचा देखील समावेश आहे. मात्र, शासन निर्णय निघून आता तब्बल १५ वर्षांचा कालावधी उलटूनही जालना येथील महिलांसाठीची औद्योगीक प्रशिक्षण संस्था सुरु झालेली नाही ही अत्यंत खेदाची बाब असल्याचे आ. गोरंटयाल यांनी या निवेदनात म्हटले आहे. सदर प्रशिक्षण संस्थेला मंजुरी दिल्यानंतर प्रशिक्षणासाठी लागणारी तांत्रिक पद भरती, लिपीकवर्गीय पदभरती तसेच त्यांना शिकविण्यासाठी लागणारी यंत्र सामुग्री व साधन सामुग्री या बाबत कोणतीही कार्यवाही झाली नसल्याने अद्याप महिलांसाठीची औद्योगीक प्रशिक्षण संस्था सुरू झाली नसल्याचे निदर्शनास आणून देत जालना हे औद्यागीक शहर असून ३ फेज मध्ये औद्योगीक क्षेत्र कार्यान्वीत आहे. स्टील उद्योगासह इतर छोटे मोठे उद्योग चालू आहेत. त्यांना कुशल कामगारांची आवश्यकता असून जालन्या सारख्या अविकसीत भागात महिलांसाठीचे प्रशिक्षण सुरू झाल्यास उद्योगांना प्रशिक्षीत कुशल कामगार मिळतील, महिलांना सुध्दा रोजगार मिळेल याकडे आ. कैलास गोरंटयाल यांनी राज्यपालांचे लक्ष वेधून आपण स्वतः या प्रकरणात लक्ष घालून १५ वर्षापुर्वी मंजुर असलेली महिला औद्योगीक प्रशिक्षण संस्था तात्काळ सुरू करावी अशी मागणी आ. गोरंटयाल यांनी राज्यपालांना दिलेल्या या निवेदनात केली आहे. यावेळी आ. राजेश राठोड, जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांची उपस्थिती होती.

### बांधकाम कामगारांच्या ...

गरजेचे असून बांधकाम कामगारांच्या मुलांनी देखील भविष्यात आयएएस आयपीएस ऑफिसर डॉक्टर वकील प्राध्यापक यासारख्या उच्च पदांवर जाऊन आपल्या जीवनमान उंचावण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले पाहिजेत त्यासाठी लोकप्रतिनिधी म्हणून मी सातत्याने आपल्या सोबत असून बांधकाम कामगारांच्या मुलांनी शिक्षणाची कास धरून स्वतःची व त्याबरोबरच कुटुंबाची प्रगती साधावी असेही यावेळी लोणीकर म्हणाले

राज्यात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांच्या नेतृत्वातील महायुती सरकारने कुठल्याही जातीपातीचे राजकारण न करता महाराष्ट्रातील अठरापगड जातीच्या लोकांसाठी काम करण्याचा प्रयत्न केला आहे याउलट महाविकास आघाडी या गोंडस नावाखाली प्रत्यक्षात जनतेला मिळणाऱ्या सेवा सुविधांना विरोध करणारे लोक आता निवडणुकीच्या तोंडावर बिळातून बाहेर येतील. भूलथापा देतील त्यापासून सावध राहण्याची गरज आहे काँग्रेस आणि त्यांच्या मित्र पक्षांनी महिला सक्षमीकरणासाठी सुरू करण्यात आलेली लाडके बहीण योजना बंद करण्यात यावी यासाठी कोर्टात याचिका दाखल केली जर काँग्रेस आणि आघाडीचे सरकार सत्तेत आले तर ते लाडके बहीण योजनेसह बांधकाम कामगारांना मिळणाऱ्या सर्व सुख सुविधा बंद करून टाकतील त्यामुळे आपण सर्वांनी सुज्ञपणे काम करणाऱ्या व्यक्तीच्या पाठीशी ठामपणे उभे राहावे असेही लोणीकर यांनी यावेळी स्पष्ट केले

यावेळी विधानसभा प्रभारी माजी आमदार संजय डीडी भाजपा प्रदेश सचिव राहुल लोणीकर रमेश भापकर शत्रुघन कणसे, प्रवीण सातोन कर प्रकाश चव्हाण बंडू मानवतकर शिवराज जाधव संदीप बाहेकर कृष्णा आरगडे गोपी ठाकूर, नरेश कांबळे माधव भैया जनकवार यांच्यासह मोठ्या संख्येने लाभार्थी कामगारांची उपस्थिती होती

छाया फाऊंडेशनच्यावतीने राज्यपालांना श्री विठ्ठल मूर्ती भेट

# फाऊंडेशनच्या कार्यास सर्वतोपरी मदतीचे राज्यपाल यांचे आश्वासन

**जालना । प्रतिनिधी -** डॉ भताने'ज छाया फाऊंडेशनचे संस्थापक डॉ. गोविंद भताने व ऍड. महेश भताने यांनी महाराष्ट्राचे राज्यपाल श्री. सी. पी. राधाकृष्णन यांची जालना जिल्ह्या दौऱ्यावर असताना भेट घेतली. कौतुक करत, संस्थेला भविष्यातील उपक्रमांसाठी लागेल ती सर्व मदत करण्याचे आश्वासन दिले.

या भेटी दरम्यान राज्यपालांनी फाऊंडेशनच्या कार्याची सविस्तर माहिती जाणून घेतली. संस्थेच्या समाजातील दुर्बल घटकांना आधार मिळतो. ग्रामीण भागातील गरजू लोकांपर्यंत मदत पोहोचवण्याचे कार्य अत्यंत महत्त्वाचे आहे आणि यात फाऊंडेशनने महत्त्वाची भूमिका बजावली आहे. अशी कौतुकाची थाप दिली.



यावेळी त्यांचे श्री.विठ्ठलाची मूर्ती भेट देऊन स्वागत करण्यात आले. या प्रसंगी राज्यपालांनी डॉ.भताने'ज छाया फाऊंडेशनच्या समाजकार्यातील उत्कृष्ट कार्याचे सामाजिक, शैक्षणिक आणि आरोग्य क्षेत्रात होत असलेल्या योगदानाची त्यांनी प्रशंसा केली. यावेळी बोलताना डॉ.भताने'ज छाया फाऊंडेशनसारख्या संस्थांमुळे राज्यपालांनी संस्थेच्या उपक्रमांना भरभरून शुभेच्छा दिल्या आणि पुढील काळात फाऊंडेशनच्या कामाला लागेल ते पाठबळ देण्याचे आश्वासनही दिले.

**फाऊंडेशनचे विविध उपक्रम आणि योगदान**

डॉ. गोविंद भताने यांनी राज्यपालांसमोर फाऊंडेशनच्या विविध उपक्रमांचे सादरीकरण केले. महिला सक्षमीकरण, आरोग्य शिबिरे, शैक्षणिक मदत आणि अनाथ मुलांसाठीच्या प्रकल्पांसोबतच ग्रामीण भागातील लोकांच्या जीवनमान सुधारण्याच्या दिशेने केलेले प्रयत्न यांचा त्यांनी आढावा घेतला.

ऍड. महेश भताने यांनी फाऊंडेशनच्या आगामी योजनांची माहिती दिली. समाजातील दुर्बल घटकांसाठी आर्थिक, शैक्षणिक व वैद्यकीय मदतीची व्यवस्था करणे हे आमचे ध्येय असून, आगामी काळात अनेक नवीन उपक्रम हाती घेतले जाणार आहेत, असे ते म्हणाले.

**राज्यपालांच्या भेटीचा फाऊंडेशनला मोठा लाभ**

राज्यपालांच्या भेटीमुळे डॉ.भताने'ज छाया फाऊंडेशनच्या संचालकांना एक नवी ऊर्जा मिळाली आहे. त्यांच्या आश्वासनामुळे भविष्यातील उपक्रमांना चालना मिळेल अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. या भेटीमुळे स्थानिक पातळीवर सामाजिक कार्याच्या दिशेने आणखी प्रयत्न करण्याची प्रेरणा मिळाली आहे.

**जालना दौऱ्याचा परिणाम**

राज्यपालांच्या या दौऱ्यामुळे जालना जिल्ह्यातील सामाजिक संस्थांना नवा आत्मविश्वास मिळाला आहे. फाऊंडेशनच्या कार्याच्या कौतुकामुळे स्थानिक पातळीवर या उपक्रमांना अधिक बळकटी मिळेल, अशी आशा व्यक्त केली जात आहे.

यावेळी विभागीय आयुक्त दिलीप गावडे, जिल्हाधिकारी डॉ श्रीकृष्णनाथ पांचाळ, जि.प.च्या मुख्य कार्यकारी अधिकारी वर्षा मीणा, पोलिस अधीक्षक श्री.अजयकुमार बन्सल, अतिरिक्त पोलीस अधीक्षक श्री.आयुष नोपाणी, मनपा आयुक्त संतोष खांडेकर, आदी यावेळी उपस्थित होते.

# जालन्यासह सर्व तालुक्यांत सुसज्ज सांस्कृतिक सभागृहे उभारावी

डॉ. संजीवनी तडेगांवकर यांची राज्यपालांकडे मागणी



**जालना । प्रतिनिधी -** जालना जिल्ह्याचे सांस्कृतिक वैभव असलेले मा.कृष्णराव फुलंब्रीकर नाट्यगृह बकाल अवस्थेमुळे मागील दहा वर्षांपासून बंद असून कवी, साहित्यिक ,नाटककार ,कलावंतांची देन लाभलेल्या जालना शहरासह प्रत्येक तालुक्यात सांस्कृतिक सभागृह उभारावे अशी मागणी भावकवियत्री म.सा.प.च्या केंद्रीय कार्यकारिणी संचालिका डॉ. संजीवनी तडेगांवकर यांनी राज्यपालांकडे केली आहे. जालना दौऱ्यावर आलेल्या राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी शासकीय विश्राम गृहात डॉ.संजीवनी तडेगांवकर यांच्या सोबत चर्चा, विचारविनिमय करून संवाद साधला. यावेळी जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांची उपस्थिती होती. डॉ तडेगांवकर यांनी मराठीला अभिजात भाषेचा दर्जा दिल्याबद्दल केंद्र आणि राज्य शासनाचे अभिनंदन करून राज्यपालांना दिलेल्या लेखी निवेदनात सांस्कृतिक सभागृहा अभावी कवी ,साहित्यिक, कलावंत, रसिक वर्गाची होत असलेली घुसमट राज्यपालांच्या निदर्शनास आणून दिली. शासन स्तरावर पाठपुरावा करूनही सांस्कृतिक सभागृह उभारणीस यश आले नाही. येथील रसिकांची सांस्कृतिक भूक भागविण्यासाठी तसेच साहित्यिक, सांस्कृतिक उपक्रम, व्याख्याने याकरिता शासनाने सुसज्ज असे सांस्कृतिक सभागृह उपलब्ध करून द्यावे, अशी मागणी डॉ. संजीवनी तडेगांवकर यांनी केली.

रेणुका माता मंदिर टेंभुर्णी येथे स्वामी समर्थ केंद्रतर्फे

# दुर्गा सप्तशतीच्या पाठ; नऊ दिवस जागरण



**टेंभुर्णी । प्रतिनिधी -** येथील रेणुका माता संस्थानच्या रेणुका माता मंदिरामध्ये नवरात्र उत्सव व शारदीय नवरात्र उत्सवाची आयोजन करण्यात आलेले आहे या आयोजनानिमित्त, स्वामी समर्थ केंद्र तर्फे दुर्गा सप्तशती पाठाचे सप्ताह रूपांतर करण्यात आले असून नऊ दिवस वाचन करण्यात येणार आहे.

या सप्तशती पाठाच्या वाचनासाठी महिलांची गर्दी होत आहे. यावर्षी पासून सप्तशती पाठाचा नऊ दिवस पठण करण्यात येत असल्यामुळे. नवरात्र उत्सवानिमित्त दुर्गा देवीचे महत्व सर्वांना माहीत होत आहे.

या सप्तशती पाठाच्या वाचनाच्या दरम्यान सौरभना मनोज पंडित यांच्या नेतृत्वात हे पाठाचे नियोजन होत आहे. याप्रसंगी सौ. मीना भिसे, सौ गोदावरी मुळे, सौ संगीता इंगळे, सौ मीरा जयतमल, सौ पाटील ताई, सौ अंजू बुजाडे, सौ सुनीता धनवाई, मनीषा धनवई, सरिता धनवाई, सौ मंजू काबरा,सौ रंजना डोमळे, सौ कविता काबरा, सौ पूजा जाधव, सारिका धनवई, सौ पूजा देशमुख तसेच अनेक महिला या उपस्थित राहत असून महिलांची गर्दी वाढत आहे.

# जाफ्राबाद तालुका अनुसूचित जाती जमातीच्या अध्यक्षपदी डॉ राहुल हिवाळे याची निवड

**टेंभुर्णी । प्रतिनिधी -** जालना जिल्ह्यातील काँग्रेस पक्ष च्या वतीने ओबीसी व अनुसूचित जाती जमाती च्या समूहाच्या वतीने मेळावा घेण्यात आला होता.

यावेळी जाफ्राबाद तालुका अध्यक्ष पदी राहुल संतोष हिवाळे तपोवन येथील सामाजिक कार्यकर्ते याची काँग्रेस पक्षाचे जिल्हा ध्यक्ष राजाभाऊ देशमुख दिनकर घेवंदे बाळासाहेब आबीरे यांनी एका नियुक्ती पत्राद्वारे निवड केली आहे..सदरील निवडचे भास्कर गोफणे शुभम मुळे आरेफ शेख आफोश शेख यांनी अभिनंदन केले.



वारंवार तक्रारी व आमरण उपोषणानंतर महापालिकेकडुन कामाला सुरुवात

# २५ वर्षांनंतर संभाजीनगर भागात नवीन पाईपलाईन अंथरण्याचे काम सुरु - डॉ. भोडोने

**जालना । प्रतिनिधी -** जालना शहरात प्रियदर्शनी कॉलनी येथील कांबळे गल्ली, अंभोरे गल्ली, राजगिरे गल्ली येथे २५ वर्षांपासून नळाला पाणी येत नव्हते.

महानगरपालिकेला अनेक तक्रारी दिल्या होत्या. त्याची दखल न घेतल्यामुळे महानगरपालिके समोर डॉ. रामकृष्ण भोडाने (समाजसेवक) सह येथील रहिवाशांनी दि. ०७/१०/२०२४ रोजी आमरण उपोषण केले. या उपोषणाची आयुक्त महानगरपालिका जालना शहर यांनी दखल घेवून संभाजीनगर येथील कांबळे गल्ली, अंभोरे गल्ली, राजगिरे गल्ली येथे नवीन पाईपलाईन टाकून पाणी पुरवठा



सुरू करण्यात आला. पाणीपुरवठा सुरळीत केल्याबद्दल आयुक्त संतोष खांडेकर, पाणी पुरवठा विभागातील श्री बगळे यांचे डॉ.भोंडोने यांच्यासह परिसरातील नागरिकांनी आभार व्यक्त केले. तसेच मागणी लावून धरत पूर्ण करणाऱ्याचा प्रयत्न करणारे डॉ.भोडोंने यांचे या भागातील नागरिकांनी सत्कार केला.

# मुख्यमंत्री वयोश्री योजनेचे अर्ज स्विकारण्यास मुदतवाढ

**जालना । प्रतिनिधी -** राज्यातील ६५ वर्षे व त्यावरील ज्येष्ठ नागरीकांना त्यांच्या दैनंदिन जीवनात सामान्य स्थितीत जगण्यासाठी व वयोमानपरत्वे येणा-या अंपगत्व, अशक्तपणा यावर उपाययोजना करण्यासाठी आवश्यक सहाय्यक साधने, उपकरणे खरेदी करण्याकरीता मुख्यमंत्री वयोश्री योजना सुरु करण्यात आली आहे.

या योजनेंतर्गत पात्र लाभार्थी यांना अर्ज करण्यासाठी शासनाने दिनांक ३१ ऑक्टोंबर, २०२४ पर्यंत मुदतवाढ दिली आहे. तरी जिल्हयातील ज्या पात्र ज्येष्ठ नागरीकांनी अद्याप पर्यंत मुख्यमंत्री वयोश्री योजनेचा अर्ज केला नसेल अशा ज्येष्ठ नागरीकांनी दि. ३१ ऑक्टोंबर, २०२४ पर्यंत सहायक आयुक्त, समाजकल्याण, जालना, संबंधीत गट विकास अधिकारी, संबंधित नगरपालिका, महानगर पालिका या ठिकाणी अर्ज दाखल करावेत, असे आवाहन सहायक आयुक्त, समाजकल्याण, जालना यांनी केले आहे.

# कक्कय्या समाज महिला सन्मान सोहळा संपन्न!

**मुंबई । प्रतिनिधी -** चांदिवली विधान सभा मतदारसंघातील कार्यसम्राट आमदार मा .दिलीप मामा लांडे यांच्या



सहकार्याने दि. ८ऑक्टोबर रोजी कक्कय्या समाज महिला सन्मान सोहळा काजूपाडा येथील प्रजापती सभागृहात आयोजित करण्यात आला होता.या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने कक्कय्या समाज महिला भगिनींनी उपस्थिती लावली होती.या कार्यक्रमाची प्रस्तावना कामगार नेते सुर्यकांत इंगळे यांनी केली.

याप्रसंगी व्यासपीठावर कक्कय्या समाज संस्थेचे अध्यक्ष श्री.व्यंकटराव शिंदे,भाजपा मुंबई सचिव गोविंद खरटमोल, कक्कय्या समाज सेवा मंदिर चे अध्यक्ष श्री.राजकुमार त्रिमुखे, महिला अध्यक्षा सौ. सुलोचना दरवेश, सचिव विठ्ठल खरटमोल, श्री मारुती व्हटकर, शिवसेना महिला शाखा प्रमुख सौ.पार्वती शिंदे, वेरुळ कक्कय्या समाज सेवा मंडळाचे सचिव मा .अशोक पाटेकर , कक्कय्या समाज प्रतिष्ठान चे सचिव विनायक कटके, नगरसेवक कुरेशी व अन्य पदाधिकारी उपस्थित होते.

# जय भवानी क्रीडा मंडळाच्या वतीने आरोग्य शिबीर संपन्न!



**जालना । प्रतिनिधी -** महाराष्ट्र शासन राज्यस्तरीय विशेष वैद्यकीय मदत कक्ष आणि केईएम वैद्यकीय विभाग कक्षा च्या सहकार्याने तसेच जय भवानी क्रीडा मंडळ आयोजित धारावी नवी चाळ येथे नवरात्रौ उत्सवानिमित्त दिनांक ९ऑक्टोबर रोजी सकाळी १०वाजता संपूर्ण आरोग्य चाचण्या,वैद्यकीय उपचार,मोफत औषध व आभा कार्ड नोंदणी चे आयोजन करण्यात आले होते.यावेळी केईएम हॉस्पिटलचे डॉक्टर प्राध्यापक अमित भोंडवे व त्यांच्या टीमने शिबिरामध्ये सहभागी झालेल्या शेकडो नागरिकांना तपासणी व उपचार करून मोफत औषधे दिली. तसेच आभा कार्डची ही नोंद करण्यात आली. यावेळी १३डॉक्टर, ५ संयोगिता मेडिकल स्टाफ यांच्यासह धारावी शास्त्रीनगर दवाखाना डॉक्टर व सी एच व्ही यांचेही सहकार्य लाभले. सदर आरोग्य शिबीर यशस्वी करण्यासाठी जय भवानी क्रीडा मंडळाचे संयोजक व समाजसेवक गिरीराज शेरखाने,गौतम व्हटकर,दिलीप गाडेकर स्थानिक कार्यकर्ते यांनी परिश्रम घेतले.

युवकांचा भाजपात प्रवेश; परतुर विधानसभा प्रभारी संजय डीडी, प्रदेश सचिव राहुल लोणीकर यांची उपस्थिती

# विकासाच्या मुद्द्यावर विविध पक्षातील युवक भाजपात - आ. लोणीकर



**परतूर । प्रतिनिधी -** गेल्या दहा वर्षात परतूर विधानसभा मतदारसंघाचा झालेला विकास आणलेल्या विविध योजना गरिबांसाठी केलेले काम या बळावरच भारतीय जनता पार्टीमध्ये रोज मोठ्या संख्येने युवक प्रवेश करीत असल्याचे प्रतिपादन माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांनी केले ते लावणी येथील काँग्रेस कार्यकर्ते आष्टी येथील वंचित बहुजन आघाडीचे कार्यकर्ते व परतूर शहरातील कार्यकर्त्यांच्या भाजपा प्रवेश सोहळा प्रसंगी बोलत होते

पुढे बोलताना ते म्हणाले की, पक्ष संघटना मजबूत करीत असताना कार्यकर्त्यांनी तळागाळापर्यंत काम करून पक्षाचा नावलौकिक आणखीन वाढवावा त्यासाठी प्रयत्न करण्याची यावेळी बोलताना त्यांनी नमूद केले

यावेळी माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर छत्तीसगडचे माजी आमदार परतुर विधानसभा मतदारसंघाचे प्रभारी संजय डीडी भाजपा प्रदेश सचिव राहुल लोणीकर यांच्या उपस्थितीमध्ये अंकुश काळे यांच्या पुढाकाराने लावणे येथील काँग्रेस कार्यकर्ते अंकुशराव काळे यांच्या पुढाकाराने माजी सरपंच सुदाम जाधव गजानन जाधव ग्रामपंचायत सदस्य सुरेश जाधव सुरेश राठोड परसराम आडे प्रल्हाद राठोड आसाराम आसाराम जाधव अनिल जाधव मोहन चव्हाण प्रदीप जाधव अक्षय जाधव एकनाथ राठोड बाबा जाधव तर आष्टी येथील बाबाराव थोरात मधुकर मोरे नंदकुमार गांजे रंगनाथ येवले योगेश भले श्री गांजाळे यांच्या पुढाकारांनी वंचित बहुजन आघाडीतील वंचित बहुजन आघाडीचे जिल्हा उपाध्यक्ष बाबुराव गोसावी ॲड सुरेश काळे (आदिवासी समन्वय समिती सदस्य), वंचित बहुजन आघाडीचे तालुका उपाध्यक्ष शोएब पठाण महेश चव्हाण लखन काळे शक्ती पवार विजय पवार सुरेश चव्हाण माऊली सागुते गणपत पवार बाळासाहेब सागोते मंगल पवार अजय पवार वीर चव्हाण अंकुश चव्हाण शंकर चव्हाण यांनी तर परतूर शहरातील मिराज शेख यांच्या पुढाकारांनी आबेद कुरेशी फरहान कुरेशी सरताज कुरेशी शायद कुरेशी समीर कुरेशी आदींनी भारतीय जनता पार्टीमध्ये प्रवेश केला.

# जालना येथे बेस्ट बिड्स अबॅकस राज्यस्तरीय स्पर्धा उत्साहात



**जालना । प्रतिनिधी -** विश्वजित एज्युकेशनल हब प्रा.लि.द्वारे आयोजित राज्यस्तरीय अबॅकस स्पर्धा ६ ऑक्टोबर २०२४ रोजी जालना शहरातील मातोश्री लॉन येथे मोठ्या उत्साहात तसेच थाटात पार पडली. या स्पर्धेसाठी संपूर्ण महाराष्ट्रातून १००० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून जे ई एस कॉलेज,जालनाचे उपप्राचार्य तथा व्याख्याते बी.वाय. कुलकर्णी सर हे उपस्थित होते. यावेळी त्यांनी पालकत्व या विषयावर पालकांशी महत्वपूर्ण संवाद साधला आणि उपस्थित सर्वांना अनमोल असे मार्गदर्शन केले.यावेळी प्रमुख अतिथी म्हणून श्रीमती सीमाताई अर्जुनराव खोतकर यांची उपस्थिती होती.

या स्पर्धेचे आयोजन बेस्ट अबॅकसच्या डायरेक्टर श्रीमती अरुणा अर्जुन ठाकूर यांनी केले होते. या कार्यक्रमाचे उत्कृष्ट सुत्रसंचलन श्रीमती मनीषा पाटील मॅडम यांनी केले. यावेळी स्पर्धेत सहभागी विद्यार्थ्यांसह पालक व शिक्षक, शिक्षिका यांची उपस्थिती होती.






हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.